# विवेकानंद सेवा मंडळ, मलकापूर (जि. बुलडाणा)
## आश्रमाचा रौप्य महोत्सव
(जीवन-विकास मासिक ऑक्टोबर-२००७)

# विवेकानंद सेवा मंडळाचा संक्षिप्त इतिहास





मलकापूर येथे विवेकानंद सेवा मंडळाची सुरुवात १४ फेब्रुवारी १९८२ रोजी झाली. त्या अगोदर रामकृष्ण मठ, नागपूरातील संन्यासी वृंदांच्या विशेषत: पूज्य स्वामी राकानंदजी महाराज यांच्या सततच्या संपर्कामुळे श्रीरामकृष्ण-विवेकानंद भावधारेवर विश्वास असलेला भक्तपरिवार हळूहळू येथे निर्माण झाला. वेळोवेळी सत्संग व भगवान श्रीरामकृष्णदेवांच्या जयंतीला ज्ञानेश्वरी पारायण अशा कार्यक्रमांतून श्रीरामकृष्ण-विवेकानंद भावधारेवर विश्वास असलेले कार्यकर्ते संघटित होत गेले व पुढे रीतसर मंडळाची स्थापना झाली. रामकृष्ण संघाच्या अनेक संन्यासी वृंदांच्या मार्गदर्शनात हळूहळू मंडळाला एक स्थायी स्वरूप प्राप्त होत गेले; स्थानिक सार्वजनिक वाचनालयाच्या एका छोट्याशा पडवीत विवेकानंद सेवा मंडळात भगवान श्रीरामकृष्ण, माताजी श्रीसारदादेवी व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांची स्थापना करून नियमित पूजा-प्रार्थना, भजन, संकीर्तन इत्यादी कार्यक्रम सुरू झाले. अनेक भक्त विशेषत: सुरवातीपासूनच आश्रमात युवकांची संख्या वाढत गेली. त्यांना पू. भाष्यानंदजी महाराज, पू. आत्मानंदजी महाराज, पू. भौमानंदजी महाराज इत्यादी संन्यासी वृंदांचे मार्गदर्शन मिळाले होते. त्यातून पुढे येथील ७ युवकांनी आपले सर्वस्व श्रीरामकृष्णांच्या श्रीचरणी अर्पण करून रामकृष्ण संघात प्रवेश केला. उत्तरोत्तर वाढत असणाऱ्या भक्त-परिवाराच्या सहकार्यातून नगरपरिषदेच्या मोकळ्या जागेमधील ३६००० चौरस फूट जागा ९९ वर्षांच्या करारावर मंडळाला मिळाली. तसेच एका भक्ताने १ एकर २४ गुंठे जागा मंडळाला दिली.




सन २००१ मध्ये श्रीरामकृष्ण-विवेकानंद भावधारा परिषद महाराष्ट्राच्या अर्धवर्षीय बैठकीसाठी पू. स्वामी भौमानंदजी महाराज, पू. स्वामी वागीशानंदजी महाराज, पू. ब्रह्मस्थानंदजी महाराज, पूज्य स्वामी विष्णुपादानंदजी महाराज मलकापूरला आले होते व त्यांच्या मार्गदर्शनामुळे पुढे मंडळाला नगरपरिषदेने दिलेल्या भूखंडावर १४०० चौरस फूट जागेवर साधुनिवास बांधण्यात आला. पू. स्वामी ब्रह्मस्थानंदजी महाराज यांच्या हस्ते श्रीश्रीठाकुर, माताजी, स्वामीजी यांच्या प्रतिमांची प्रतिष्ठापना करण्यात आली. इमारतीसमोर एक छोटेसे उद्यानही तयार करण्यात आले. विविध उपक्रम व उत्सवाद्वारे भक्त परिवार वाढत गेला व आश्रमास आध्यात्मिक स्वरूप प्राप्त झाले.





सद्यस्थितीत आश्रमाद्वारे पूजा, प्रार्थना, विविध उत्सव, प्रवचने, सत्संगाचे कार्यक्रम इत्यादी आध्यात्मिक सेवा सुरू आहे. तसेच मंडळाद्वारे संचालित विवेकानंद सार्वजनिक ग्रंथालय, दरवर्षी गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार व्हावेत म्हणून विवेकानंद बालक संघाचा दर रविवारी ८.३० ते १० पर्यंतचे संस्कार वर्ग इत्यादी शैक्षणिक सेवा सुरू आहे.



आश्रमाच्या दवाखान्यातून गरजूंवर होमिओपॅथी व आयुर्वेदिक पद्धतीने उपचार करण्यात येतात. गरजू लोकांना गेल्या नोव्हेंबर महिन्यात ३५०० घोंगड्यांचे वाटप करण्यात आले. सन २००६ जुलै मध्ये पूरपीडितांसाठी मदतकार्य केले. त्याकरिता रामकृष्ण मठ व रामकृष्ण मिशन, मुंबई या केंद्राद्वारे रु. ३,१३,०००/- आर्थिक सहाय्य प्राप्त झाले होते.



## आश्रमाचा रौप्य महोत्सव व आध्यात्मिक शिबीर

विवेकानंद सेवा मंडळ, मलकापूर (जि. बुलडाणा) या आश्रमाचा रौप्य महोत्सव दि. १९ व २० ऑगस्ट २००७ रोजी संपन्न झाला. याप्रसंगी दोन दिवसांच्या निवासी-अनिवासी आध्यात्मिक शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.




रामकृष्ण मठ, नागपूर येथील स्वामी ब्रह्मस्थानंद महाराज, स्वामी विपाप्मानंद महाराज व स्वामी प्रभुसेवानंद महाराज यांनी शिबिरार्थींना आध्यात्मिक मार्गदर्शन केले. याशिवाय शिबिरामध्ये प्रार्थना, स्तोत्र-पाठ, भजन-संकीर्तन, प्रश्नोत्तरे अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.





तसेच लहान मुला-मुलींनी श्रीरामकृष्णदेव, माताजी श्रीसारदादेवी व स्वामी विवेकानंद यांच्या जीवन चरित्रावरील नाटके सादर केली. या शिबिराचा १५० भक्तांनी लाभ घेतला.